आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

शनिवारी दिनांक ०८ मार्च २०२५

ठळक बातम्या

1. विकसित भारताचं स्वप्न पूर्ण करण्यात नारी शक्तीची सर्वात मोठी भूमिका असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन, लखपती दिदी योजनेच्या लाभार्थ्यांशी साधला संवाद.
2. आगामी काळात भारतीय महिलांचे भवितव्य अतिशय उज्वल - राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' कार्यक्रमाचा राज्यस्तरीय दशकपूर्ती समारोह संपन्न.
3. नागपूर सह विदर्भात विविध कार्यक्रमांनी महिला दिन साजरा.
4. नागपूर समृद्धी महामार्गावर आज सकाळी झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू, तर दहा जण जखमी.

---------------------------

लखपती दीदी

विकसित भारताचं स्वप्न पूर्ण करण्यात नारी शक्तीची सर्वात मोठी भूमिका असणार आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. नवसारीतल्या वंसी-बोरसी इथं पंतप्रधान मोदी लखपती दीदी संमेलनाला संबोधित करताना बोलत होते. या कार्यक्रमात एक लाख महिला उपस्थित होत्या. नारी शक्तीने देशाच्या प्रगतीची कमान सांभाळली आहे. महिलांचा सन्मान ही समाज आणि देशाच्या विकासाची पहिली पायरी आहे, असं पंतप्रधान म्हणाले.

*(होल्ड बाईट - पंतप्रधान २४ सेकंद)*

*नारी का सम्मान यही समाज और देश के विकास की पहली सीढ़ी होती है। इसलिए विकसित भारत बनाने के लिए भारत के तेज विकास के लिए आज भारत वुमेन लेड डेवलपमेंट की राह पर चल पड़ा। हमारी सरकार महिलाओं के जीवन में सम्मान और सुविधा दोनों को सर्वोच्च प्राथमिकता देती है।*

माझ्या आयुष्यात मला कोट्यवधी माता-भगिनींचा आशीर्वाद मिळाला, हे माझं भाग्य आहे. हे आशीर्वाद सर्वात मोठी प्रेरणा आहे, असं मोदी यावेळी म्हणाले. लिज्जत पापड, अमूलसारख्या उद्योगातील महिलांच्या सहभागाचं त्यांनी कौतुक

केलं. स्वयं सहाय्यता गटाच्या सामर्थ्याला वाढवण्यासाठी सरकारने या योजनेचा निधी पाचपटींनी वाढवला, असं त्यांनी सांगितलं. तत्पूर्वी, पंतप्रधानांनी आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्तानं आज गुजरातमधल्या नवसारी जिल्ह्यात 'लखपती दीदी' योजनेच्या दहा लाभार्थींशीही संवाद साधला.

---------------------------

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

महिला दिनाच्या निमित्तानं आज नवी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते 'नारी शक्ती से विकसित भारत' या एक दिवसीय संमेलनाचं उदघाटन झालं. महिलांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी महिला दिन साजरा केला जातो, या दिनाचं औचित्य साधून सर्वांनी लिंगभाव समानतेत सुधारणा घडवून आणण्याचा संकल्प करूया असं आवाहन त्यांनी यावेळी केलं. महिलांच्या सक्षमीकरणासाठी सरकार विविध योजना राबवत असल्याचं राष्ट्रपती म्हणाल्या....

*(होल्ड बाईट - राष्ट्रपती २४ सेकंद)*

*नारी शक्ति बंधन अधिनियम के द्वारा लोकसभा और विधानसभाओं में महिलाओं के लिए आरक्षण का प्राध्यान उनके राजनीतिक सशक्तिकरण की दिशा में ऐतिहासिक कदम। जमीनी स्तर पर महिलाओं को सशक्त बनाने के लिए स्वयं सहायता समूहों से उन्हें जोड़ा जा रहा है तो आर्थिक आत्मनिर्भरता प्राप्त करें। इसके लिए लखपति दीदी कार्यक्रम चल रहा है। नमक ड्रोन दीदी योजना भी महिलाओं के आर्थिक और तकनीकी सशक्तिकरण का माध्यम बने रहे।*

केंद्रीय महिला आणि बाल कल्याणमंत्री अन्नपूर्णा देवी या संमेलनात सहभागी झाल्या आहेत.

---------------------------

बेटी बचाओ, बेटी पढाओ'

आज महिला सर्वच क्षेत्रात आघाडीवर असून राज्यातील मुख्य सचिव, पोलीस महासंचालक तसेच अनेक महत्वाच्या वरिष्ठ पदांवर महिला अधिकारी कार्य करत आहेत. विद्यापीठांमधील पदवीदान समारोहात अधिकांश सुवर्ण पदके मुलींना प्राप्त होत आहेत. त्यामुळे आगामी काळात भारतीय महिलांचे भवितव्य अतिशय उज्वल आहे असे प्रतिपादन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आज केले. आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाच्या महिला आणि बालविकास विभागातर्फे 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' कार्यक्रमाचा

राज्यस्तरीय दशकपूर्ती समारोह तसेच उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान सोहळा राज्यपाल राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत राजभवन मुंबई येथे संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते.कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे, उपस्थित होते. २०२९ साली संसदेत तसेच राज्यांच्या विधानमंडळात ३३ टक्के महिला प्रतिनिधी असणार याचा आपणास अभिमान वाटत आहे, असे उद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रसंगी काढले. नागपूर महिला सन्मान क्रेडिट कोऑपरेटिव सोसायटी प्रमाणे राज्यात इतरत्र देखील महिलांसाठी पतसंस्था सुरु करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

---------------------------

वेव्हज्

मुंबई इथं आयोजित केल्या जाणाऱ्या वेव्हज् या जागतिक दृक श्राव्य आणि मनोरंजन शिखर परिषदेच्या तयारीचा केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी काल मुंबईत आढावा घेतला. भारताच्या आध्यात्मिक वारशाला चालना देणं, देशाला जागतिक सामग्री केंद्र आणि निर्यातदार म्हणून स्थान देणं, बौद्धिक संपदा परिसंस्थेला चालना देणं, आदी गोष्टींना चालना देण्यासाठी या परिषदेचं आयोजन केलं जाणार असल्याचं त्यांनी माध्यमांना सांगितलं. तसंच भारतीय माध्यमांची जागतिक उपस्थिती वाढवणं आणि मोठ्या आंतरराष्ट्रीय गुंतवणूक आकर्षित करणं, यावर देखील या परिषदेत भर दिला जाणार असल्याचं जाजू म्हणाले.

---------------------------

महिला दिन नागपूर

राज्यसह विदर्भात महिला दिन विविध कार्यक्रमांनी साजरा होत आहे. नागपूर दूरदर्शन केन्द्र कार्यालयात जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून नागपूर आकाशवाणी केंद्राचे उप-महानिदेशक (अभियांत्रिकी) रमेश घरडे तसच कार्यक्रम प्रमुख रचना पोपटकर-गजभिये, अविनाश निमजे(कार्यालय प्रमुख, अभियांत्रिकी) कार्यक्रम निष्पादक मीनल पाठराबे आणि अधिकारी, कर्मचारी, आमंत्रित मान्यवर अतिथी उपस्थित होते,पहिल्या सत्रामध्ये हेल्थ चेकअप कॅम्पचे आयोजन करण्यात आल,दुस-या सत्रात सायबर सीक्रुटी अव्हरनेस चे आयोजन करण्यात आले, या सत्रामध्ये सुनिल सदासिवन यांनी मार्गदर्शन केले. तिस-या सत्रात स्ट्रेस मॅनेजमेंट या

विषयावर मानसोपचार तज्ञ अनुपमा गडकरी  यांनी मार्गदर्शन केले.तसच अपर्णा लखमापूरे यांनी एकपात्री प्रयोगाच सादरीकरण केल. जागतिक महिला दिन राज्यात ठिकठिकाणी साजरा होत असून, अकोला शहरात महिला आणि बालविकास विभागामार्फत बेटी बचाव बेटी पढाव उपक्रम तसंच वॉकेथॉनद्वारे महिला सक्षमीकरणाचा संदेश देण्यात आला. जिल्हाधिकारी अजित कुंभार आणि मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी यांनी हिरवा झेंडा दाखवून या उपक्रमाचा शुभारंभ केला. अमरावती जिल्हा प्रशासनातर्फे आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजित वॉकथॉनमध्ये महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. तसेच समारोपीय कार्यक्रमात विविध क्षेत्रात कार्यरत महिलांचा सन्मान करण्यात आला. गोंदीया शहरात आज जागतिक महिला दिनानिमित्त सायकल संडे ग्रुपच्या महिलांनी सायकल रॅली काढत हा दिन साजरा केला, या रॅलीत गृह पोलिस अधिकक्ष आणि उप विभागीय महिला पोलिस अधिकारी तसंच गोंदिया शहरातील तरुणींची उपस्थिती होती. यवतमाळमध्ये जागतिक महिला दिनानिमित्त महिला मदत केंद्रातर्फे तीन महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यात आला. दारिद्र्यरेषेखालील आणि गरजू महिलांना छोटे व्यवसाय चालविण्यासाठी मोफत जागा आणि मशीनरी पुरविली जाते. यातून त्यांनी आपला छोटा रोजगार कमवावा अशी या मागची संकल्पना आहे. स्वयं रोजगार मिळालेल्या प्रियंका तुरी यांनी आपले मनोगत व्यक्त केले..

*(होल्ड बाइट - १५ सेकंद)*

*मी शिवणकाम करते ते माझ्याकडे मशीन नसल्यामुळे महिला मदत केंद्रामध्ये मॅडमनी  मला  मशीन उपलब्ध करून दिले होते आणि शिवण काम आहे. ते थोडेथोडे आता म्हणजे चालू आहे शिवायचे. आम्ही टीपा वगैरे ब्लाऊज वगैरे शिवतो थोडे थोडे व्यवसाय चालू आहेत.*

जागतिक महिला दिनानिमित्त आज गडचिरोली पोलिस विभाग, समाजकल्याण विभाग आणि एकात्मिक आदिवासी विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने पोलिस मुख्यालयाच्या सभागृहात महिला बचत गटांना कृषी अवजारांचं वाटप करण्यात आलं.

---------------------------

समृद्धी अपघात

मुंबई - नागपूर समृद्धी महामार्गावर बुलढाणा जिल्ह्यातील सिंधखेड राजा जवळ आज सकाळी झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला असून दहा जण जखमी

झाले आहेत. जखमींवर जालना इथल्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यवतमाळहून शिर्डीला जाणाऱ्या भाविकांच्या चारचाकीचं टायर फुटल्यानं ती कारला धडकली. यात दोघांचा जागीच मृत्यू झाल्याचं पोलिसांनी सांगितलं.

----------------------------

सद्भावना पदयात्रा

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येने संपूर्ण महाराष्ट्र हादरला. महाराष्ट्राला शिव, शाहू, फुले, आंबेडकर, या महापुरुषांचा गाडगे बाबा, तुकडोजी महाराज यांच्याराख्या महान संताचा वारसा लाभलेला आहे. संतोष देशमुख यांचा बळी एका प्रवृत्तीमुळे गेला आहे. ही लढाई एकट्या देशमुख कुटुंबाची नाही तर सर्वांना ही लढाई लढावी लागणार आहे. भविष्यात अशी घटना पुन्हा घडू नये, क्रुरता नष्ट व्हावी, ही सद्भावना पद यात्रा आयोजित करण्यात आली आहे. असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

----------------------------